**जिहे कठापूर उपसा सिंचन योजना, ता. कोरेगाव, जि.सातारा या प्रकल्पास रुपये १०८५.५३ कोटी इतक्या किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: जिहेक१०१०/प्र.क्र.६१२/१०/मोप्र-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- ०६ नोव्हेंबर, २०१७

**पहावे**:- महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचा निर्णय क्रमांक- जिहे कठापूर/ उसिंयो/ प्रशा- २/२९७/(११/९७) दि.११/०२/१९९७, दि. ११/०२/१९९७.

**प्रस्तावना** :

जिहे कठापूर उपसा सिंचन योजना हा प्रकल्प महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत "उर्वरित महाराष्ट्र" या प्रदेशामध्ये आहे. जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेचा उद्भव कृष्णा नदीवर सातारा जिल्ह्यातील कठापूर गावाजवळ असून या योजनेद्वारे एकूण ३ टप्प्यांमध्ये (स्थिर उंची २०९.८४ मी.) ३.१७ अ.घ.फू. पाणी उचलून त्याद्वारे सातारा जिल्हयातील अवर्षण प्रवण भागातील खटाव तालुक्यातील ११७०० हे. व माण तालुक्यातील १५८०० हे. याप्रमाणे एकूण २७५०० हे. (ICA) क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण पाणी वापर ३.१७ अ.घ.फु. इतका असून त्यापैकी धोम बलकवडी धरणामधून ०.५३ अ.घ.फू. व कृष्णा नदीतून २.६४ अ.घ.फू. इतका पाणी वापर नियोजित आहे.

जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने सन १९९७ मध्ये रु.२६९.०७ कोटी इतक्या किंमतीस(दरसूची १९९५-९६) मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती.

तथापि,बांधकामाचे दरम्यान दरसूचीतील बदलामुळे वाढ, जास्त दराची निविदा स्वीकृतीमुळे वाढ, भुसंपादनाच्या किंमतीतील वाढ(विशेषत: नविन भुसंपादन कायद्यामुळे),संकल्पचित्रातील बदलामुळे वाढ, कामाच्या व्याप्तीतील बदल, अपुऱ्या तरतूदीमुळे झालेली वाढ, नवीन तरतूदीमुळे झालेली वाढ व इतर अनुषंगीक खर्चामुळे प्रकल्प किंमतीत वाढ झाली. त्यामुळे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर केला होता.

प्रकल्प अहवालावर दि. ०७/९/२०१७ रोजी झालेल्या व्यय अग्रक्रम समितीचे बैठकीत चर्चा झाली आहे. व्यय अग्रक्रम समितीने बांधकामाची सद्य:स्थिती, किंमत वाढीची कारणमिमांसा, प्रकल्पातील कामाच्या अनुषंगाने, सिंचनविषयक विशेष चौकशी समितीच्या अहवालात नमूद केलेली निरीक्षणे व त्या अनुषंगाने केलेली कार्यवाही याचा परामर्श घेऊन सातारा जिल्ह्याच्या माण व खटाव तालुक्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रास वरदान ठरणाऱ्या जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेचे काम पूर्णत्वास नेण्याच्या उद्देशाने, जलसंपदा विभागाच्या सन२०१३-१४ च्या दरसूचीवर आधारित रुपये १०८५.५३ कोटी इतक्या किमंतीच्या प्रथम सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय -**

जिहे कठापूर उपसा सिंचन योजना, ता.कोरेगाव, जि. सातारा, या प्रकल्पाच्या जलसंपदा विभागाच्या सन २०१३-१४ च्या दरसूचीवर व सा.बां.विभागाच्या सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारित रुपये १०८५.५३ कोटी (रुपये एक हजार पंच्याऐंशी कोटी त्रेपन्न लक्ष फक्त) [प्रत्यक्ष कामासाठी रुपये ९८३.०१ कोटी (रुपये नऊशे त्र्याऐंशी कोटी एक लक्ष) व अनुपंगीक खर्च रुपये १०२.५३ कोटी (रुपये एकशे दोन कोटी त्रेपन्न लक्ष)] इतक्या किंमतीस खालील अटींच्या अधीन राहून प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) जिहे कठापूर उपसा सिंचन योजना या प्रकल्पासाठी केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त झाल्याशिवाय निविदा प्रक्रिया व प्रकल्पाचे काम सुरू करू नये.
२) निधी उपलब्धतेनंतर प्रथमतः कृष्णा नदीवरील बॅरेज, पंपगृह १,२,३ व उर्ध्वगामी नलिकेचे एका रांगेचे काम पहिल्या टप्प्यात पूर्ण करावे.
३) राज्यस्तरिय तांत्रिक सल्लागार समिती च्या अहवालातील मुद्यांची पूर्तता करावी.
४) जलसंपदा विभागाच्या दिनांक २/५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार या प्रकल्पांतर्गतच्या लाभक्षेत्रात सूक्ष्म सिंचनास पुरक वितरण व्यवस्था निर्माण करण्याच्या अनुपंगाने तसेच वितरण व्यवस्थेचे भू-संपादन कमी करणेसाठी प्राधान्याने तांत्रिक निकपाच्या आधारावर नलिका वितरण प्रणालीचा अवलंब करावा.
५) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय प्रकल्पात समावेश करू नये.
६) संपुर्ण लाभक्षेत्रामध्ये पाणीवापर संस्था स्थापन करुन सिंचन व्यवस्थापन पाणीवापर संस्थेस हस्तांतरीत करावे.
७) सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वितीकरणाचे विविध टप्प्यावर क्षेत्रिय अधिका-यांनी घेतलेल्या विविध निर्णयास व क्षेत्रिय अनियमितता झाली असल्यास अशा अनियमिततेस सहमती असे गृहीत धरता येणार नाही.

प्रकल्पाच्या उपशिर्षनिहाय तरतुदींचा गोपवारा परिशिष्ट “अ” मध्ये सोबत जोडला आहे.

या प्रकल्पाच्या कामावरील खर्च मागणी क्र. आय-५, मुख्य लेखाशीर्ष ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, (८०)सर्वसाधारण, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, (०२) योजनांतर्गत, (०२) (०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (उर्वरित महाराष्ट्र) (संगणक संकेतांक ४७०१ एच-६२९) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.११६/१४३४,दि.१९/५/२०१७ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.१८४/व्यय-१२, दि.१४/८/२०१७ अन्वये तसेच व्यय अग्रक्रम समितीने दि.०७.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११०६१५५३२५००२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tirmanwar Santosh Ramkishan

Digitally signed by Tirmanwar Santosh Ramkishan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf0117ad341668a72bc3fcc8a83a2fab1d9b23e2ae276141178afc4dc8b5d790, serialNumber=37b5be33c57130083d7c9245fb12e91e0019861744c920676df5a5236c14b3a2, cn=Tirmanwar Santosh Ramkishan
Date: 2017.11.06 16:44:39 +05'30'

**सहपत्र: परिशिष्ट "अ"**

**(सं. रा. तिरमनवार)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत-**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
५) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.

## परिशिष्ट "अ"

जिहे कठापूर उपसा सिंचन योजना, ता.कोरेगाव, जि. सातारा, या प्रकल्पाच्या प्रथम सु.प्र.मा. नुसार उपशिर्षनिहाय तरतुदींचा गोपवारा

(रक्कम रु. कोटी मध्ये)

| उपशिर्ष | मूळ प्रमा नुसार तरतुद | प्रथम सुप्रमा नुसार तरतुद | वाढ/घट (+/-) | मार्च २०१६ अखेर झालेला खर्च | उर्वरित किंमत |
|---|---|---|---|---|---|
| (A) शिर्ष कामे | | | | | |
| ए-प्राथमिक कामे | ०.१९ | ३.१५ | २.९७ | २.४५ | ०.७० |
| बी-जमीन | ०.०८ | ६१.८६ | ६१.७७ | ५.३७ | ५६.४९ |
| सी-कामे | १४५.३९ | ७८०.१३ | ६३४.७५ | ३२७.८४ | ४५२.२८ |
| डी-विमोचक | ०.०० | ०.२६ | ०.२६ | ०.०० | ०.२६ |
| एफ-आर एच.टी. | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| जी-ब्रिजेस | ०.०० | ०.२५ | ०.२५ | ०.०० | ०.२५ |
| एच-एस्केप. | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| के-इमारत | ०.७० | २.७० | २.०० | ०.०० | २.७० |
| एल-मातीकाम | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| एम-वनीकरण | ०.०१ | ०.१२ | ०.११ | ०.०० | ०.१२ |
| ओ-संकिर्ण | ०.२० | १.७७ | १.५७ | ०.५० | १.२७ |
| पी-देखभाल | ०.३६ | ७.९२ | ७.५६ | ०.०० | ७.९२ |
| क्यु-हत्यारे व सहयंत्रे | ०.३६ | ०.०० | -०.३६ | ०.०० | ०.०० |
| आर-दळणवळण | ०.१० | ८.१९ | ८.०९ | ०.०० | ८.१९ |
| यु-वितरीका | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| एक्स-इनव्हायरमेंटल | ०.०० | ०.१७ | ०.१७ | ०.०० | ०.१७ |
| वाय-लॉसेस | ०.०० | १.९८ | १.९८ | ०.०० | १.९८ |
| **एकूण (A)** | १४७.३८ | ८६८.५१ | ७२१.१२ | ३३६.१७ | ५३२.३४ |

| उपशिर्ष | मूळ प्रमा नुसार तरतुद | प्रथम सुप्रमा नुसार तरतुद | वाढ/घट (+/-) | मार्च २०१६ अखेर झालेला खर्च | उर्वरित किंमत |
|---|---|---|---|---|---|
| (B) कालवे व वितरण व्यवस्था | | | | | |
| ए-प्राथमिक कामे | ०.१८ | २.३५ | २.१७ | ०.०० | २.३५ |
| बी-जमीन | ०.६६ | १०.०६ | ९.४० | ०.०० | १०.०६ |
| सी-कामे | १५.८५ | ६०.७६ | ४४.९१ | ०.०० | ६०.७६ |
| डी-विमोचक | ०.०४ | ०.०० | - ०.०४ | ०.०० | ०.०० |
| एफ-आर एच.टी. | १६.२१ | ०.०० | - १६.२१ | ०.०० | ०.०० |
| जी-ब्रिजेस | ०.८१ | ०.०० | - ०.८१ | ०.०० | ०.०० |
| एच-एस्केप. | ०.०२ | ०.०० | - ०.०२ | ०.०० | ०.०० |
| के-इमारत | ०.८९ | ०.१७ | - ०.७२ | ०.०० | ०.१७ |
| एल-मातीकाम | २९.५० | ०.०० | - २९.५० | ०.०० | ०.०० |
| एम-वनीकरण | ०.००० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ओ-संकिर्ण | ०.०४ | ०.०० | - ०.०४ | ०.०० | ०.०० |
| पी-देखभाल | ०.१३ | ०.६१ | ०.४८ | ०.०० | ०.६१ |
| क्यु-हत्यारे व सहयंत्रे | १.८९ | ०.०० | - १.८९ | ०.०० | ०.०० |
| आर-दळणवळण | ०.१५ | ०.०० | - ०.१५ | ०.०० | ०.०० |
| यु-वितरीका | १.९० | ४०.३९ | ३८.४९ | ०.०० | ४०.३९ |
| एक्स-इनव्हायरमेंटल | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| वाय-लॉसेस | ०.०० | ०.१५ | ०.१५ | ०.०० | ०.१५ |
| **एकूण (B)** | ६८.२५ | ११४.५० | ४६.२५ | ०.०० | ११४.५० |
| **(C) एकुण कामे (A + B)** | **२१५.६३** | **९८३.००** | **७६७.३७** | **३३६.१७** | **६४६.८३** |
| **(D) आस्थापना व इतर कामे** | **५३.४४** | **१०२.५३** | **४९.०९** | **२९.१२** | **७३.४१** |
| **एकुण (C + D)** | **२६९.०७** | **१०८५.५३** | **८१६.४६** | **३६५.२९** | **७२०.२४** |